# प्रकरण चौथे

# 'बारोमास'ची संरचना

- ❖ प्रस्तावना
- ❖ पार्श्वभूमी
- ❖ कादंबरीतील मूल्यात्मकता
- ❖ 'बारोमास'मधील मुख्य कथानक
- ❖ 'अलका व एकनाथ यांच्या अपयशी संसाराची करुण कहाणी'
- ❖ ग्रामीण परिसरातील लोकांना करावा लागणारा संघर्ष
    १. शेतकऱ्यांच्या पिकांना मिळणारी किंमत
    २. शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे चित्रण
    ३. प्राणी, पशू-पक्षी यांची दुष्काळामुळे होणारी होरपळ
    ४. भौतिक सुखाच्या मागे लागलेली सोनेरी टोळी
    ५. शेतकरी संघटना व त्यांच्या मागण्या
    ६. राजकीय लोकांचे चित्रण
    ७. ममता वारे आणि एकनाथ यांचे चित्रण
    ८. शहरी संस्कृतीचा प्रभाव
    ९. रावसाहेब याची आत्महत्या
    १०. नानू आजाचा स्वभाव
- ❖ समारोप
- ❖ संदर्भग्रंथ

## प्रकरण चौथे

# 'बारोमास'ची संरचना

### प्रस्तावना

भारतीय साहित्याच्या संदर्भात एकोणिसावे शतक महत्त्वाचे ठरते. याच शतकाने आधुनिक भारताला जन्म दिला. याच काळात विविध स्थित्यंतरांबरोबरच घडणाऱ्या सर्वांगीण परिवर्तनातून समाजजीवनात बदल घडून आले. या बदलातून ग्रामीण कादंबरी जन्माला आली आणि ती बहरली सुद्धा. विविध विषयांना आपल्या कवेत घेण्याची क्षमता या ग्रामीण कादंबरीत दिसू लागली. त्यामुळे या कादंबरीची व्याप्ती वाढली. म्हणून ग्रामीण साहित्याचा वेगळा प्रवाह निर्माण झाला. या प्रवाहातूनच अनेक श्रेष्ठ दर्जाच्या कादंबऱ्या निर्माण झाल्या आणि त्यातीलच अलिकडच्या काळातील कादंबरी म्हणजे 'बारोमास' होय. ही ग्रामीण कादंबरी आधुनिक काळातील मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबाच्या संसाराचे चित्र रेखाटणारी असून ग्रामीण तरुणांना जीवन जगत असताना कसे संघर्ष करावे लागतात, हे या कादंबरीचे मुख्य कथानक आहे. या कादंबरीत मुख्य कथानकास सहकार्य करणारी अनेक समाजचित्रणे आली आहेत. त्या आधारे आपण या कादंबरीची संरचना अभ्यासू.

### पार्श्वभूमी

सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या कादंबरीची संरचना थोडी वेगळी आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर कोणत्याही मराठी साहित्यकांने इतके परखड लेखन केलेले नव्हते. ते त्यांनी केलेले आहे. म्हणूनच 'बारोमास' ही कादंबरी थोडी विस्तृत आणि बहुआयामी झाली आहे. कादंबरीच्या निर्मितीविषयी लेखक लिहितो, ''शेतकऱ्यांच्या जीवनाला बारोमास वेढून असणाऱ्या जन्मजात वेदनेच्या हुंकारातून ही कादंबरी आकाराला आली आहे. माझ्या सभोवतालचा ओला-सुका ग्रामीण

परिसर हेच तिचे प्रेरणास्थान आहे. लेखकाने आपल्या निष्ठा आणि अनुभव यांच्याशी प्रामाणिक राहून लेखन करावे, असे वाङ्मयीन संस्कार माझ्यावर झाले आहेत. त्या संस्काराचेच फलित म्हणजे बारोमास ही कादंबरी आहे; असे मी समजतो.''[१] अशी ही अतिशय संस्कारित कलाकृती आहे. म्हणून ती वाचकांना जवळची वाटते.

ग्रामीण भागातील वेगवेगळ्या पद्धतीने जीवन जगणारे अनेक घटक या कादंबरीत अधोरेखित होतात. एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबाला व त्यांच्यातील तरुणांना जीवन जगत असताना कोणकोणते संघर्ष करावे लागतात, त्यात त्यांना अपयश कसे येत जाते; हे विदर्भातील पार्श्वभूमीवर चित्रित केलेले आणि महाराष्ट्राच्या कोणत्याही ग्रामीण भागात सहज पहायला मिळेल अशी पार्श्वभूमी लाभलेली ही कादंबरी आहे. कादंबरीतील समाजचित्रण, व्यक्तिरेखा, घटना-प्रसंग आणि गतिमान निवेदन यामुळे कादंबरीला उंची प्राप्त होते.

कादंबरीच्या संरचनेसंबंधी किशोर सानप लिहितात, ''कादंबरीची भाषिक मांडणी करताना आशयमूल्याच्या अनुषंगाने तंत्र समुच्चयाची संरचना केली जाते. शैली हे संरचनेचे अधिष्ठान आहे. कादंबरीच्या सर्वच घटकद्रव्याला जरी प्रायोगिकतेचे परिणाम लाभत असले , तरी संरचनेच्या विशिष्ट तत्त्वात त्यांना मांडणे, शैलीच्या आविष्काराच्या दृष्टीने आवश्यक असते. संरचनेची काही घटक तत्त्वे असतात. उदाहरणार्थ: काळ संकल्पना, स्थल संकल्पना आदी. कादंबरीची सर्वच तंत्रे आशयमूल्याच्या अंगाने विकसित होतात. हा विकास संरचनेच्या माध्यमाने होत असतो.''[२] तरी 'बारोमास' या कादंबरीतील घटना-प्रसंग कोणत्याही अर्थाने आपणास काल्पनिक वाटत नाहीत.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

## कादंबरीतील मूल्यात्मकता

मराठी ग्रामीण कादंबरीच्या प्रवासातली ही अलिकडच्या काळातली कादंबरी आहे. 'यमुनापर्यटन'पासून ते आजपर्यंतची कादंबरी ही वास्तवाशी अतूट नाते सांगणारी आहे. तरी 'बारोमास' ही कादंबरी जगण्याचा नवा मूल्यविचार मांडताना आपणास दिसते.

देशाला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे पूर्ण झाली तरीही या देशातील ग्रामीण भागात आज जीवन आवश्यक वस्तू उपलब्ध होत नाहीत. ग्रामीण भागात जीवन जगणाऱ्या अनेक तरुणांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खूप काही बदल होतील. अशी अपेक्षा होती. ती ग्रामीण तरुणांच्या बाबतीत मृगजळच ठरली.

ग्रामीण भागातील तरुण शिक्षण घेऊन पुढे आला. पण केवळ शिक्षण घेऊन त्याला चालणार नाही तर त्याला व त्याच्या कुटुंबाला जगण्यासाठी काही तरी धडपड केली पाहिजे; ही जाणीव तरुणांच्यात निर्माण होऊ लागली. याविषयी लेखक लिहितो, ''खरंच माणसाला काहीतरी काम हवंच. आणि ते असतंच. माणसांनाच काय, पशू-पक्षी, गुरे-ढोरे सगळ्यांनाच असतं. एवढुशी मुंगी पण तोंडात काहीतरी घेऊन सारखी इकडच्या तिकडं फेऱ्या घालत असते. कोणताही जीव असो, जन्माला आला की काम आलंच. वळवळ आलीच. चळवळ आलीच. सगळं पोटाच्या भुकेसाठी. जीवाला पोटच नसतं तर? भूकच नसती, चळवळ नसती ! पण मग कोणीच हालचाल केली नसती आणि सगळी सृष्टी मग बथ्थड झाली असती. म्हणूनच चालतेफिरते जीवच काय, एका ठिकाणी उभी असणारी झाडंही फांद्या-पानांचे हजारो हात हलवून सारखी वळवळ करीत असतात.''[३] तर माणसांनी काहीतरी केलेच पाहिजे याच विचाराने या कादंबरीतील नायक एकनाथ शिक्षण घेण्यासाठी मोहाडीला जातो आणि शिक्षण पूर्ण करतो.

## 'बारोमास'मधील मुख्य कथानक

### 'अलका व एकनाथ यांच्या अपयशी संसाराची करुण कहाणी.'

'बारोमास'मधील मुख्य कथानक हे अलका व एकनाथ यांच्या अपयशी संसाराचे चित्र स्पष्ट करणारे आहे. एकनाथ शिक्षण पूर्ण करतो. तेव्हा त्याच्या आईला वाटत असते. की आपल्या मुलाने आपल्या भावाच्या मुलीशी विवाह करावा. पण एकनाथ ऐकत नाही. तो शहरी भागात राहिल्याने आणि तेथील परिसर आवडल्याने तो तेथीलच एका इंजिनिअरच्या मुलीशी विवाह करतो. एकनाथ हा एम. ए. बी. एड. झालेला असतो. म्हणून त्याला मुलगी दिलेली असते. इंजिनिअरची मुलगी अलकाही शिकलेली असते. पण तिला बी.एड. करता आलेले नसते. म्हणून ती एकनाथशी विवाह करण्यास तयार होते. तिला वाटत असते, आपला पती एम. ए. बी. एड. आहे. नोकरी कोठेतरी मिळेलच. इथून कांदबरीच्या मुख्य कथानकाला सुरुवात होते.

विवाह झाल्यानंतर अलका एकनाथबरोबर संजोळात येते. सांजोळात अलकाच्या सासरी अत्यावश्यक अशा बऱ्याच वस्तू नसतात, फक्त आपला पती एम.ए.बी.एड. एवढेच तिचे समाधान. तिला वाटत असते की, आपणाला इथे जास्त दिवस रहावे लागणार नाही. आपला पती एवढा शिकलेला आहे त्याला कोठेतरी नोकरी मिळेलच. या आशेवर ती एकनाथचा संसार करत असते. एकनाथच्या संसारात अनेक गोष्टीची कमतरता असते. घरात अनेक सुख-सुविधा नसतात. तरीही अलका चुलीवर काळ्या-पांढऱ्या धुराच्या वेटोळ्यात स्वयंपाक करत असते.

मोहाडी आणि सांजोळ या दोन गावात फारच फरक असतो. अलका मोहाडीला वाढल्याने तिच्यावर तिथले संस्कार झालेले असतात, त्यामुळे अलका त्या पद्धतीने राहणीमान ठेवत असते. पण एकनाथला मात्र सवयच असते. ग्रामीण भागात राहणे, बोलणे, फिरणे या सर्व गोष्टी त्याला नवीन नसतात. अलकाला मात्र दिवसेंदिवस या सर्व गोष्टींना जमवून घेणे कठीण वाटू लागते.

तशातच अलकाला एकनाथची आई शेवंतामाय त्रास देऊ लागते. कोणत्याही घरकामात सहकार्य करत नाही. कारण तिच्या मनाविरुद्ध एकनाथने अलकाशी विवाह केलेला असतो. म्हणूनच त्याचा राग ती अलकावर काढत असते.

एकनाथचा लहान भाऊ मधु हा देखील बेकारच असतो. त्यालाही कोठेच नोकरी नसते. म्हणून तोही घरातच असतो. एकदा मधुला मुलगी देण्यासाठी पाहुणे येतात. तेव्हा अलका त्या पाहुण्यांना सांगते, ''खूप दरिद्री आणि भिकारचोट घर आहे हे. शेतकऱ्यांच घर आहे. कधीही हाय हायच राहते इथं. पाहुणे आले की पावभर साखर अन् चहाची पुडी आणायला दुकानवर पळावं लागते. मजुरापेक्षाही वाईट परिस्थिती. आज पाहुणचार करायचा म्हटलं तर पावभर तेल, किलोभर रवा अन् किलोभर साखर वेळेवर विकत आणली होती. जेवण झाल्यावर द्यायला घरात सोपसुपारी नाही, म्हणून आता दुकानावर गेला माझा दीर...''[४] असे ती पाहुण्यांना सांगत असताना मधु जिन्याजवळच्या दाराजवळ उभा राहून ते ऐकतो. तेव्हापासून तो अलकाशी बोलणे बंद करतो.

अलकावर पूर्वी बहिणीसारखे प्रेम करणारा मधु नंतर बदलतो अलका त्याच्या मनातून उतरते. तिच्याबद्दल मधुला तिरस्कार वाटू लागतो. तेव्हापासून अलका व मधु यांचे जमत नाही. अगोदरच नोकरी नाही म्हणून चिडलेल्या मधुला अलकाचे हे शब्द खूपच जिव्हारी लागतात. काळजात आग लागल्यासारखे होते. म्हणून पुढील काळात मधु अलकाच्या विरोधात जातो.

घरातील वातावरण हळूहळू अलकाच्या विरोधात जावू लागते आणि अलका अस्वस्थ होताना दिसू लागते. तशातच यावर्षी शेतात कोणकोणती पिके घ्यायची याविषयी चर्चा चालू होते. पण चर्चा होऊन शेवटी थांबते ती पैशाजवळ. तेव्हा शेवंतामाय सांगते की, सुनबाईच्या बांगड्या विकून पैसे आणा. असे ऐकता क्षणीच अलकाला चुलीतला जाळ आपल्या अंगावर आल्यासारखा वाटतो. ती धगधग नजरेने सासूकडे पाहते तेव्हा एकनाथला भीती वाटते आणि तो आईला म्हणतो,

एकदा बांगड्याची मोडतोड झाल्यावर त्या घेता येत नाहीत. वर्षाच्या अगोदरच अलकाची सोन्याची पोथ विकली ती अजून घेतली नाही. तरी अशा विविध कारणाने घरातील वातावरण वळणे घेऊ लागते. अलका चिडू लागते. एकनाथला नोकरी नाही म्हणून ती ओरडू लागते. शेत विकून पैसे दिले असते तर एकनाथला नोकरी मिळाली असती असे अलका सांगते. तेव्हा शेवंतामाय त्याला विरोध करते आणि शेती कशी महत्त्वाची आहे ते सांगते. तेव्हा त्या दोघीत एक वेगळाच संघर्ष निर्माण होतो. शिकलेली आणि बिनशिकलेली सारखीच आहेत असे एकनाथला वाटते.

अलका न जेवताच माडीवर जाऊन झोपते. थोड्या वेळाने एकनाथ तिच्याजवळ जातो व जेवण केलीस का ? असे विचारत तिच्या अंगावर हात टाकतो. तेव्हा ती ताबडतोब त्याला झिडकारते व उठून बसते. तिला लग्नात भेट मिळालेले कपाट उघडून त्यातील साड्या काढते व पलंगाखालची सुटकेस बाहेर काढून पलंगावर ठेवते आणि त्या साड्या त्यात भरते आणि माहेरी जाण्यासाठी तयारी करू लागते आणि अलका एकनाथला म्हणते, ''इथं राहिले तर बांगड्यासाठी जीव घेतील तुमच्या घरातले हैवान...'' अलकाला असे वाटते म्हणून ती माहेरी जाण्यासाठी एकनाथला पैसे मागते. पण एकनाथकडे पैसे नसतात. तेव्हा अलका ममता वारेकडूनच पन्नास रुपये उसने घेते आणि आपली सुटकेस घेऊन निघते. एकनाथ तिच्या मागेच असतो. अलका रस्त्याला लागते तेव्हा ती मागे फिरूनसुध्दा पहात नाही. अलकाचे माहेरी जाणे हे काही पहिल्यांदाच नव्हते. पण हे असेच किती दिवस चालणार असे एकनाथला वाटते. तेवढ्यात समोरच्या भावकीतला शंकर तात्या येतो व विचारतो काय भांडण झाले की काय? तर एकनाथ सांगतो तिची परीक्षा आहे. अलकाला सोडून एकनाथ घरी येतो. तर शेवंतामाय व मधु यांचे संभाषण चालू असते. ते पण त्याला ऐकवत नाही. तेव्हा तो सरळ खाली येतो. आणि कल्याणीच्या मळ्याकडे चालू लागतो. अशा मनाच्या फाटक्या अवस्थेत मळा एकच आधार असतो.

अलका माहेरीच असते म्हणून एकनाथ तिला बोलवायला मोहाडीला जातो. तेव्हा अलका त्याच्यासोबत सांजोळात येते आणि पुन्हा एकनाथच्या संसाराला सुरुवात करते. सडा-सारवण, चहा-पाणी, भाकरी-भाजी, धुणं-धाणं, भांडी घासणं ही सर्व कामे करू लागते. आधीच ती नाजूक असते आणि अशा या कामाने ती पूर्ण सुकून जाते. रात्री झोपते ती दिवसभरच्या कामान थकून आणि सकाळी उठते ते दिवसभराच्या कामाच्या धास्तीने. अशा पद्धतीने अलका घरात काम करत असते, तर शेवंतामाय कोणत्याच प्रकारे घरकामात अलकाला मदत करत नाही.

घरातील अशा वातावरणामुळे एकनाथला त्रास होऊ लागतो. त्यात तो शिकलेला असूनही त्याला नोकरी मिळत नाही. म्हणून आपण विनाकारण शिकलो असे त्याला वाटायला लागते. आपण शहरातल्या मुलीशी लग्न केले. आपण कसे तरी सावरू पण तिला कसे सावरायचे हा प्रश्न एकनाथसमोर पडतो. एकनाथला नोकरी लागत नाही तेव्हा तो शेतीतील कामे करत असतो. तेव्हा ते अलकाला आवडत नाही. याविषयी लेखक लिहितो, ‘‘कधी कधी आपण तुत्या अन् जुपणे खांद्यावर टाकून शेतात निघायचो. डवरे-वखरं हाणायला, तर अलका घट्ट आपल्याला धरून ठेवायची. डोळ्यांतून आसवं गाळत म्हणायची, हे करू नका हो. अनपडाची कामं ही. तुम्ही सुशिक्षित ! आणि रडायची. आसवं गाळत म्हणायची, काही करा. किरणा दुकान टाका. वह्या, पुस्तकाचं दुकान टाका. पानपट्टी चालवा ... पण हे भयानक काम नको. आणि रडायची.’’[६]

अशा वेळेस एकनाथला वाटते. आपण मुक्ताशी विवाह केला असता तर बरे झाले असते. अलकाला तिच्या मनासारखा पती तरी मिळाला असता पण आता त्याला काहीच करता येत नाही. अशाही स्थितीत एकनाथ अलकाला बोलवायला मोहाडीला जातो. कारण अलका सारखी मोहाडीला जात असते. एकनाथ मोहाडीत गेल्यानंतर झाडाकडे पाहून सुखावतो पण त्याचवेळी अलका नेहमी माहेरीच जाते म्हणून दुखावतोही.

मोहाडीत अलकाच्या वडिलांच्या घरी संध्याकाळी सर्वांचे जेवण झाल्यानंतर एकनाथ सांगतो की अलकाला पाठवून द्या. त्यावर अनेकजण होय नाही म्हणत असतात. शेवटी अलकाचे वडील सांगतात, पंधरा दिवसासाठी घेऊन जा. पुढच्या महिन्यापासून ती कॉम्प्युटरचा कोर्स करणार आहे. मग पाठवून द्या. तेव्हा एकनाथ व अलका सांजोळला जातात. काही दिवस ठीक जातात, पण मधु व अलका यांचे काही पटत नाही. किरकोळ कारणावरून त्यांच्यात भांडणे होत असतात.

मधुला एकदा साबण हवा असतो. तेव्हा अलका साबण देत नाही. यावरून त्यांच्यात वाद वाढत जातो. केवळ साबण हे मधु व अलका या दीर भावजयच्या भांडणाचे कारण नाही. याची मुळे मधुला पाहुणे पाहण्यासाठी येतात तेव्हा या घराण्याची अलका वस्तूस्थिती पाहुण्यांना सांगते खऱ्या अर्थाने इथेच दीर भावजायांच्या वादाची ठिणगी पडते आणि शेवटी मधु अलकाला मारतो. अलका खाली पडते आणि मोठमोठ्याने रडायला लागते. याविषयी लेखक लिहितात, ''अगं आई गऽऽ मारलं... मला मारलं... उभ्या आयुष्यात मी कोणाचा मार नाही घेतला. या राक्षसाने मला मारलं... कसं करू मी... बाबाला आणा ... आईला आणा ... अग आई गऽऽ.''[७] असा आक्रोश करत अलका जमिनीवर लोळू लागते. तेव्हा बरीच धावपळ होते.

मधु शीळ वाजवत एकनाथच्या समोर येतो. एकनाथ त्याला विचारतो, तू माझ्या पत्नीला का मारलास? तेव्हा मधु उद्धट उत्तर देतो. त्यामुळे त्या दोघात बरीच झटापट होते. घरातील बऱ्याच वस्तू इकडे तिकडे फेकल्या जातात, काही वस्तू फुटतात आणि एकच गोंधळ होतो. तेव्हा अलका या घरात एक क्षणही थांबायला तयार नसते. ती ममता वारेला पन्नास रुपये उसने मागते आणि या घरातील सर्वच माणसे पशू आहेत. मी माहेरी जाते असे ती सांगते. तेव्हा ममता वारे अलकाला शांत करण्याचा प्रयत्न करते पण ती काही ऐकत नाही. तेव्हा शेवंतामायही तिला समजून सांगण्याचा प्रयत्न करते. पण अलका माहेरी निघून जाते. ती कायमचीच परत न येण्यासाठी.

अलका आणि एकनाथ यांच्यातील एक संसारिक नाते इथे संपते. आणि पुढे कादंबरीत अनेक समाजचित्रणे येताना दिसतात. अलका माहेरी गेल्यानंतर एकनाथ शेतकरी संघटनेत सामील होतो. शेतकऱ्यांसाठी कार्य करू लागतो. पण पुढे एकनाथला याच शेतकरी संघटनेच्या मोर्चाच्यावेळी अटक होते. आणि आपल्या दोन्हीही मुलांना नोकरी लागत नाही. संसारात सुख नाही म्हणून सुभानराव जांभुळखोऱ्यात जातात आणि कादंबरी पूर्ण होते. बारा महिने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कुटुंबातील तरुणांना जो संघर्ष करावा लागतो. तो संघर्ष इथे चित्रित होत असतानाच,'अलका व एकनाथ यांच्या अपयशी संसाराची करुण कहाणी' तर ठरतेच परंतु 'बारोमास' ही कादंबरी केवळ एका व्यक्तीची शोकांतिका नसून ती ग्रामीण कुटुंबाचीच शोकांतिका आहे असे कादंबरीच्या अभ्यासावरून स्पष्ट होते आणि ही कादंबरी कृषी जीवनाशी निगडीत असणाऱ्या प्रत्येक शेतकरी जीवनाचे, ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकारांचे प्रातिनिधिक रूप ठरते.

## ग्रामीण परिसरातील लोकांना करावा लागणारा संघर्ष

आज सर्वसाधारणपणे पाहिले तर ग्रामीण परिसरातील लोकांना खूपच संघर्षमय जीवन जगावे लागत आहे. शेतीतून मिळणारे जे उत्पादन आहे त्याला चांगली किंमत मिळत नाही आणि तशाही परिस्थितीत जर उत्पन्न घ्यायचे, शेती करायची म्हटले; तर निसर्ग साथ देत नाही. तो शेतकऱ्यांचा एक नंबरचा शत्रू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची दुरवस्था झाली आहे. या निसर्गाचा परिणाम फक्त मानवी जीवनावरच झाला नाही तर प्राणी, पशूपक्षी यांच्यावरही होताना दिसत आहे. एकंदरीत कोणत्याच प्रकारे यश व पैसा या लोकांना मिळत नाही. तरीही या कादंबरीतील बेकार तरुणांना भौतिक सुखाची ओढ लागली आहे. म्हणूनच सोनेरी टोळी निर्माण झाली आहे.

ग्रामीण परिसरात शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी आज अनेक ठिकाणी शेतकरी संघटना निर्माण होत आहेत. त्या माध्यमातून ते शासनाच्या दरबारी आपल्या मागण्या मांडत आहेत. पण

त्याचा फारसा विचार होताना दिसत नाही. कारण राजकीय लोकांचे दुटप्पी धोरणच शेतकऱ्यांना अडचणीत आणत आहे. या विविध समाजचित्रणाबरोबरच ममता वारे आणि एकनाथ यांच्यासंबंधी काही प्रसंग चित्रित होतात. तर शहरी संस्कृतीचा प्रभाव ग्रामीण परिसरात कसा पडत आहे आणि त्या प्रभावातून शहराच्या आकर्षणाबरोबरच ग्रामीण परिसरात येणाऱ्या अपयशामुळे शेतकरी कशी आत्महत्या करतात; हे कादंबरीतून लेखकाने दर्शविले आहे. या कलाकृतीत सुरुवातीलाच नानू आजा ही व्यक्तिरेखा आली आहे. अशा काही व्यक्तिरेखांचा उपयोग करून लेखकाने समाजचित्रण केलेले आहे. तरी आपण त्याच्या सहाय्याने संरचनेंचा अभ्यास करू.

## १. शेतकऱ्यांच्या पिकांना मिळणारी किंमत

ग्रामीण भागात आज काही शेतकरी शेती करताना दिसतात. पण शेतकऱ्यांची व शेतीची खूपच दयनीय अवस्था झाली आहे. अनेक अडचणीवर मात करत आजचा शेतकरी आपल्या शेतात पिकांचे उत्पादन घेत असताना पिकांना पाणी टँकरने देताना दिसतो. आज विदर्भासहीत प. महाराष्ट्रातही शेतकऱ्यांची अवस्था खूपच वाईट झाली आहे. अनेक द्राक्ष बागायतदार, डाळिंब बागायतदारांनी आपल्या बागा काढून टाकल्या आहेत. टँकरने पाणी शेतीला देऊन शेती करणे आज तरी शक्य होत नाही. सर्वत्रच शेतकऱ्यांना अडचणी येताना दिसतात.

अशा ही परिस्थितीत जर कोणी चिकाटीने शेती करत असेल तर त्याच्याही वाट्याला परत निराशाच येते. कारण आज बाजारपेठेत जर आपण पाहिले तर शेतकऱ्यांच्या मालाला सोडून बाकीच्या सर्व वस्तूंना निश्चित किंमत ठरऊन दिलेली आहे. शिवाय त्या किंमतीमध्ये वाढ होतानाच दिसते. पण शेतकऱ्यांच्या पिकांचे भाव मात्र निश्चित नाहीत. त्यामुळे शेतकरी नेहमीच अडचणीत, कर्जाच्या बोजाखाली जीवन जगताना दिसत आहे. कोणत्या पिकांचे किती उत्पादन घ्यावे. हाही प्रश्न शेतकऱ्यांसमोर नेहमी असतो.

कोणत्या पिकाला जास्त किंमत मिळेल याचा अंदाज करून शेतकरी पीक घेत असतो. पण त्याचा अंदाज कधीच बरोबर येत नाही. एक वर्षी लसूण महाग झाला म्हणून दुसऱ्या वर्षी अनेक शेतकऱ्यांनी लसणाचे पीक घेतले. पण त्यावर्षी लसूण कवडीमोल किंमतीने विकला. तर शेकडो वर्षात एकदाच कांद्याची किंमत वाढली. तर त्यासाठी केवढा मोठा धुमाकूळ झाला आणि दिल्लीत सरकार कोसळले. पण पुढच्याच वर्षी कांद्याचे भरपूर उत्पादन झाले तेव्हा मात्र सरकारने त्याचा विचार केला नाही. कांदा बाजारात कवडीमोल किंमतीने विकत होता. म्हणून काही शेतकऱ्यांनी कांदा रानातच सोडून दिला. तो कांदा रानातून बाहेर काढण्यासाठी जेवढा खर्च येणार होता. तेवढे उत्पन्न तो विकून मिळणार नव्हते.

शासनाचे धोरण शेतकऱ्यांच्या बाबतीत खूपच निराशजनक आहे. शेतकऱ्यांनी कोणतेही पीक घेतले तरी त्याला एकरी किंमत तीन हजार मिळताना दिसते. त्यामुळे या मिळणाऱ्या किंमतीतून शेतकऱ्याला कोणत्याच गरजा भागविता येत नाहीत. तो दिवसेंदिवस कंगालच होताना दिसत आहे.

शेतकऱ्याला कोणत्याही वस्तू खरेदी करायच्या असतील तर देणाऱ्यांच्या दारात जावे लागते. पण त्याच शेतकऱ्याला त्याचा शेतमाल जर विकायचा असेल तर त्याला व्यापाऱ्यांच्या दारात जावे लागते. एकूणच काय तर शेतकऱ्यांच्या पिकांना मिळणारी कमी किंमत हा एक नेहमीच वाढत जाणारा गंभीर प्रश्न आहे. आज बाजारातील इतर वस्तूंच्या किंमतीत जी वाढ होत आहे ती वाढ शेतकऱ्यांच्या वस्तूंच्या किंमतीत होताना दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना फारसा दिलासा मिळत नाही. त्यामुळे ते दिवसेंदिवस अडचणीत येत आहेत.

अलिकडील काळात भयानक दुष्काळ जाणवत आहे. अनेक शेतकरी जगण्यालाही मुश्कील झाले आहेत. अशा वेळेस शासनाने वेळीच दखल घेऊन शेतकऱ्यांच्या पिकांना चांगले भाव दिले तर काही अंशी शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. पण ते सरकार कधी करू शकेल? हा प्रश्न

आहेच. तरी या कादंबरीत शेतकऱ्यांच्या पिकांना मिळणारी कमी किंमत हा विषय लेखकाने चांगल्या प्रकारे मांडले आहे.

## २. शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे चित्रण

लेखक विदर्भातील दुष्काळी भाग कादंबरीत चित्रित करतात. निसर्गाच्या अवकृपेमुळे भयानक दुष्काळ ओढवला आहे. निसर्गावर मानवाने कितीही मात केली तरी निसर्ग मानवापेक्षा थोडं पुढेच आहे. म्हणून त्याचीच कृपा होणे आज घडीला तरी गरजेचे आहे. पण आज निसर्गाची अवकृपा होताना आपणास दिसत आहे. अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत, तरी अशा शेतकऱ्यांच्या स्थितीविषयी लेखक लिहितात, ''मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात भयानक गारपीट झाली. जमिनीवर, रस्त्यावर बर्फाच्या खड्यांचे ढीग साचले आणि शिवारात होतं नव्हतं ते सगळं सफाचट झालं. टोळकांदा, कांद्याची फुलं, जमिनीत मिसळून गेली. आंब्याचा मोहर झडून गेला. केळीचे फड, संत्र्याचे मळे, ऊसाची शेतं उद्ध्वस्त झाली आणि कोरडवाहू शेतकऱ्याबरोबर ओलिती शेती करणारा, जो चार-दोन टक्के शेतकरी होता, तोही आता ऊर बडवत रडू लागला.''[८] अशा प्रकारे लेखक निसर्गाचे चित्रण करत शेतकऱ्यांची स्थिती आपल्यासमोर मांडतात.

अनेक शेतकरी निसर्गाच्या या करामतीपुढे बळी पडू लागले आहेत. अनेक शेतकऱ्यांचे या गारपिटीमुळे नुकसान झाले. सरकारकडून मदत जाहीर झाली पण ती प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहचलीच नाही. मध्येच काही धनदांडग्या लोकांनी ती मदत हडप केली. तर काही ठिकाणी पिकांचे सर्वेक्षण करणारे कर्मचारी जो पैसे देईल त्याचीच नोंद करू लागले. कर्मचाऱ्यांना देण्यासाठी लोकांच्याकडे पैसे नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी त्या मदतीकडे पाठ फिरवली. अशा या निसर्गाच्या आणि नोकरशाहीच्यापुढे शेतकरी हतबल झालेला दिसतो.

## ३. प्राणी, पशू-पक्षी यांची दुष्काळामुळे होणारी होरपळ

विदर्भ व प. महाराष्ट्रात आज प्राणी, पशू-पक्षी यांची फारच वाईट अवस्था झाली आहे. सातत्याने पडणारा हा दुष्काळ; प्राणी मात्रावरही भयानक परिणाम करताना दिसतो आहे. दुष्काळामुळे आज प्राण्यांना चारा मिळत नाही. पशु-पक्षांना धान्य मिळत नाही. म्हणून त्यांची आज होरपळ होताना दिसत आहे. जनावरांच्यासाठी आज अनेक ठिकाणी चाराछावण्या काढल्या जात आहेत. पण त्या किती दिवस चालवायच्या हा देखील एक मोठा प्रश्न आहे. जनावरांना उपाशी पोटाने दारात बांधून चालणार नाही. म्हणून काही लोकांनी तर अक्षरश: आपली जनावरे सोडून दिली आहेत.

या कादंबरीतील गुलब्या-पुण्या, सुकऱ्या-बावऱ्या, पुतनी गाय, चंपी म्हैस ही सर्वच जनावरे चारापाण्यावाचून उपाशी आहेत. खंड्या गडी जोपर्यंत चारा होता तोपर्यंत या जनावरांना देतो. पण चारा संपल्यानंतर आपल्या मालकाची वाट पहात बसतो. तो काहीच करू शकत नाही. तसेच या कादंबरीत जनावरांच्याबरोबर पशुपक्षांचेही चित्रण आले आहे. त्याविषयी लेखक लिहितात, ''पावसाच्या अभावाने वर आलेले पिकाचे अंकुर करपू लागले. तासी लागलेलं पीक सोकाटून सपकू लागलं. ज्वारीच्या उगवलेल्या रोपांना कोरपड लागली. जमीन कोरडी. त्यामुळे पाखरांच्या चोची बिनधास्त मातीत घुसू लागल्या. रोपाच्या खाली असलेला बिजवाईचा दाणा घशात गिळताना रोप उलटे पालटे करू लागल्या. संकरित बियाण्याचे ते विषारी थिमीट लावून पेरलेले दाणे खाऊन रानोमाळ चिमणी पाखरं गुंगीत घोळू लागली. पटापट मरू लागली. मेल्या पाखरांना कावळे, गिधाडं टोकरू लागले. काही चुकून राहिले ते तळपत्या उन्हात वाळून कचरा झाले. मेल्या पाखरांची पिसं रानोमाळ वाऱ्याच्या झोतावर हिंदकळू लागली.''[१] इतकी वाईट

परिस्थिती निर्माण झाली. अनेक पशुपक्षांची ही अवहेलना असह्य वाटू लागते. याचे यथार्थ चित्रण लेखकाने केलेले आहे.

## ४. भौतिक सुखाच्या मागे लागलेली सोनेरी टोळी

मुख्य आशयाला बाधा न आणता त्याला पोषकच होईल अशी काही समाजचित्रणे निर्माण करतानाच सोनेरी टोळी उदयाला आली आहे. या सोनेरी टोळीच्या माध्यमातून लेखकानी समाजातील अंधश्रद्धा स्पष्ट केली आहे. बनुबासारखा मांत्रिक त्यांनी इथे आणला आहे. तो या टोळीला गुप्तधन मिळवून देतो असे आश्वासन देतो आणि कसे फसवितो व अपशकून झाला म्हणून तो कसा निघून जातो याचे चित्रण या कांदबरीत केले आहे. या चित्रणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अंधश्रद्धा स्पष्ट होते. या टोळीतील सर्वसाधारण सर्व तरुण हे बेकार आहेत. कोणाला नोकरी नाही. कोणाला व्यवसाय नाही. म्हणून ही सोनेरी टोळी निर्माण होते.

सोनेरी टोळीतील प्रत्येक तरुणांला भौतिक सुखाची भूक लागलेली असते. प्रत्येकांला पैसा हवा आहे. त्यासाठी कोणतेही काम करायला ते तयार आहेत. त्यामुळेच मधु ही सोनेरी टोळी निर्माण करतो आणि बेकार तरुणांना तो त्यात सहभागी करून घेतो. यात दिलीप पवारसारखे तरुणही मागे राहत नाहीत. कारण त्यालाही पैशाची फारच गरज असते. तोही सहभागी होतो.

मधु तर सोने-चांदी काही सापडले तर आपण काय करायचे याची मोठमोठी स्वप्ने पहात असतो. या टोळीतील अनेक सदस्य हाच विचार करीत असतात. आपणास कमीत कमी कष्टात जास्तीत जास्त सुख कसे मिळविता येईल. याचा विचार करीत असतात. पण ही सोनेरी टोळी जेव्हा प्रत्यक्ष गुप्तधन शोधायला जाते आणि गुप्तधन शोधू लागते, तेव्हा मात्र त्यांना गुप्तधन सापडत नाही. जमीन खोदत असताना दिलीप पवारला मानवी सापळा दिसतो व तो त्याच्या अंगावरच पडतो. तेव्हा तो घाबरतो व बेशुद्ध पडतो. तेव्हापासून तो वेडा होतो. अशा प्रकारचे चित्रण या

कादंबरीत लेखकाने केलेले आहे व सोनेरी टोळीचा उपयोग करून घेतला आहे. या सोनेरी टोळीचे चित्रण मुख्य कथानकाला मदतच करताना दिसते.

## ५. शेतकरी संघटना व त्यांच्या मागण्या

या कादंबरीत शेतकरी संघटनचे प्रभावीपणे चित्रण आले आहे. या संघटनेचे नेते तेजराव खपके हे सुरुवातीला शेतकऱ्यांसाठी अनेक प्रकारचे कार्य करताना दिसतात. शेतकऱ्यांसाठी मेळावे घेतात. मेळाव्यात विविध विषयांवर मार्गदर्शन करतात. सेंद्रिय खताचे फायदे सांगितले जातात; वनशेती कशी केली जाते, याविषयी माहिती देतात; वनशेती करताना आपण बोर, आवळा, चिंच, सागवान, आंबा, सीताफळ अशा झाडांचा कसा उपयोग करू शकतो आणि एकरी एक लाख रुपये कसे मिळवू शकतो, याविषयी सर्व माहिती या मेळाव्यात शेतकऱ्यांना दिली जाते. अधूनमधून घेतल्या जाणाऱ्या मेळाव्याला शेतकरी येत असतात, याविषयी लेखक लिहितो, ''मंडळाच्या वतीने अशा मेळाव्याच्या निमित्ताने शेतीतज्ज्ञांना व्याख्यानासाठी निमंत्रित केलं जायचं. त्यांच्या मार्गदर्शनाचा, नव्या विचारांचा लाभ परिसरातील शेतकऱ्यांना मिळावा असा मेळाव्याचा उद्देश असायचा. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना ह्या मंडळाविषयी आस्था होती. मात्र लहानसहान वा मध्यमवर्गीय शेतकऱ्यांना अनेक वेळा प्रयत्न करूनही ह्या पद्धतीचा अवलंब करता येत नव्हता. कारण भांडवलाच्या मर्यादा होत्या. पण तरीही पंढरीच्या वारकऱ्याने ज्या निष्ठेने पंढरपूरच्या वारीला जावं त्या निष्ठेने शेतकरी या मेळाव्याला उपस्थित राहायचे. मिळेल तेवढं पदरात पाडून घ्यायचे.''[१०]

अशा पद्धतीने काही शेतकरी मेळावे आयोजित केले जात होते. शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जात होते. शेतकऱ्यांना संघटनेचे महत्त्व पटवून दिले जात असतानाच एकनाथाच्या मनातले विचार सळसळू लागतात, याविषयी लेखक लिहितो,

''अपना राज आयेंगा

कमानेवाला खायेंगा ...

'लुटानेवाला जायेंगा ... नया जमाना आयेंगा ...'

'नोकरदार चले जाव ऽऽ'

'शेतकरी संघटनेचा विजय असो ...'

'शेतमालाला भाव नाही.

चार चाकाला वाव नाही.''''

अशा विविध मागण्यांसह ही शेतकरी संघटना पुढे जात असते. कारण शेतकरी संघटनेमध्ये शरद जोशींसारखे नेते आहेत. ते आए. ए.एस. सारख्या पदावरून शेतकऱ्यांसाठी खाली उतरले आहेत. ते शेतकऱ्यांसाठी झटताना दिसतात त्यांना शेतकऱ्यांच्या दु:खाची जाणीव आहे. ते शेतकऱ्यांसाठी अनेक कामे करताना दिसतात. म्हणून आज शरद जोशींचे नाव आहे. तरी शेतकरी संघटना असली पाहिजे. शेतकऱ्यांच्या आणि इतर कामगारांच्या संघटनेत कसा फरक आहे हे देखील लेखकाने दाखविले आहे. म्हणूनच कादंबरीत हे चित्रण महत्त्वाचे ठरते.

## ६. राजकीय लोकांचे चित्रण

राजकीय लोक सर्वसामान्य लोकांना कसे फसवितात याचे उत्तम चित्रण या कादंबरीत वास्तवपणे आलेले आहे. या कादंबरीतील आमदार मालपाणी व त्याचा पी.ए. उत्तम ठोकरे हे दोघेही चालू राजकीय लोकांचे उत्तम प्रतिनिधित्व करताना दिसतात. आज समाजात अनेक आमदार, मंत्री, खासदार ही मंडळी तरुणांना विविध क्षेत्रात नोकरी मिळवून देतो असे सांगतात आणि प्रचंड पैसा वसूल करतात. अनेक राजकीय पुढारी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनेक स्पर्धा परीक्षेत घोटाळे करतात आणि कोट्यवधी रुपये गोळा करतात. अन् ग्रामीण व शहरी

सर्वच मुलांना फसवित असतात. कारण बऱ्याच वेळा ग्रामीण भागातील तरुणांना तालुका व जिल्हा याची माहिती नसते. त्यांना हवी असते फक्त नोकरी. त्यामुळे ते राजकीय लोकांच्याकडे जातात व बळी पडतात. याचे चित्रण लेखकाने अल्पच पण प्रभावीपणे केले आहे. त्यामुळे कादंबरीच्या कथानकाला गती मिळते.

## ७. ममता वारे आणि एकनाथ यांचे चित्रण

ममता वारे ही व्यक्तिरेखाच मुळात या कादंबरीतील अलका व एकनाथ यांना मदत करण्यासाठी निर्माण केली आहे. एकनाथ हा सुशिक्षित बेकार असतो. तर ममता वारे ही प्राथमिक शिक्षिका असते. या दोन्ही व्यक्तिरेखा कादंबरीत वेगवेगळ्या पद्धतीने जीवन जगताना दिसतात. एकनाथची पत्नी नेहमी माहेरी जात असते. म्हणून तो संसारात सुखी नसतो, तर ममता वारे ही विवाह होऊन दहा वर्षे झालेले असतानाही मूल होत नाही म्हणून दु:खी असते. मात्र या दोघांच्यात एकमेकांबद्दल पुसट आकर्षण असते.

अलका भांडण करून एकनाथच्या घरातून कायमचीच परत न येण्यासाठी निघून जाते, तेव्हा एकनाथ व ममता वारे यांच्यामधील रंजनात्मक संबंध वाढविता आले असते. पण लेखकानी तसे केलेले नाही. कारण एकनाथचा स्वभावच असा आहे की, तो स्वत:च्या पत्नीजवळ जातानाही घाबरत जातो. त्यामुळे तो ममता वारेशी सलगी करू शकत नाही. तरीही एकदा एकनाथच्या मनात आलेले विचार लेखक लिहितात, ''समजा, एखाद्या दिवशी ममता वारे आपल्याला म्हणाली, मला मूल द्या. तर होईल हिंमत? अनैतिक सर्वत्र वर्ज्यते !''[१२] अशा विचाराचा एकनाथ असल्याने लेखकाने त्यांचे रंजनात्मक पद्धतीने चित्रण करणे टाळले आहे. जरी ते केले असते तर कदाचित ही कादंबरी वास्तवापासून दूर गेली असती. वास्तवाशी इमान राखण्यासाठी हे चित्रण लेखकाने केलेले

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

नाही. म्हणून दोन्ही व्यक्तिरेखांमधील संबंध मुख्य कथानकाला धक्का लावत नाहीत. मदत करतानाच दिसतात.

## ८. शहरी संस्कृतीचा प्रभाव

आज ग्रामीण भागातील लोकांचा विविध कारणांनी शहरी भागाशी संबंध येत आहे. ग्रामीण भागातील लोकांनाही शहरी पद्धतीने जीवन जगावे असे वाटत असते. घरात टी. व्ही., फ्रिज सारख्या सुखवस्तू असाव्यात असे वाटते. तर मुगुटराव सारख्यांना टी. व्ही. पाहिल्याशिवाय करमत नाही. ममता वारे ही सुशिक्षित असल्याने ती शहरी वातावरणासारखे जीवन जगताना दिसते. तिच्या घरातील सर्वच सुखवस्तू व्यवस्थित असतात. तो एक शहरी संस्कृतीचाच प्रभाव म्हणता येईल. असे काही संदर्भ कादंबरीत येतात ते योग्यच आहेत.

## ९. रावसाहेब याची आत्महत्या

या कादंबरीत रावसाहेब ही व्यक्तिरेखा येते ती एकनाथचा मेव्हणा म्हणून. तो सर्वसामान्य पद्धतीने जीवन जगत असतो. पण दिवसेंदिवस त्याचेही कर्ज वाढत जाते. त्याला कर्ज देणारा बालूशेठ सारखे पैशांची मागणी करत असतो. पण रावसाहेबकडे पैसे नसल्याने आणि दुसरीकडून कोठेही न मिळाल्याने तो अखेर कंटाळून आत्महत्या करतो हे चित्रण समाजातील अनेक आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे नेतृत्व करते आणि कादंबरीत जिवंतपणा आणते.

## १०. नानू आजाचा स्वभाव

कादंबरीच्या सुरुवातीलाच लेखकाने नानू आजाचे व्यक्तिचित्रण उपयोजिले आहे. ते चित्रण कादंबरीत वातावरण निर्मिती करण्यासाठी आणि कादंबरीची पार्श्वभूमी निर्माण करण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते. तेच लेखकाने साधले आहे.

## समारोप

'बारोमास' वाचत असताना वाचक अंतर्मुख होतो व विचार करायला लागतो. कोणत्याही परिसरात, कोणत्याही गावात ही घटना घडू शकते. इतके सहज लेखन या कादंबरीचे झालेले आहे. मुख्य कथानक हे अपयशी संसाराचे चित्रण करते. तर या कथानकाच्या सोबत येणारी जी इतर समाजचित्रणे आहेत ती आवश्यक आहेत. आणि जेवढे आवश्यक आहेत. तेवढेच या कादंबरीत चित्रित होताना दिसतात. कादंबरीत समाजचित्रण, व्यक्तिरेखा, कथानक हे मुख्य घटक आहेत, त्याचबरोबर भाषाशैली, पार्श्वभूमी, संवाद, घटना-प्रसंग हेही महत्त्वाचे आहेत. या सर्व घटकांच्या सहाय्याने 'बारोमास' या कलाकृतीची संरचना निर्माण होते.

## संदर्भग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | देशमुख, सदानंद | 'बारोमास' कॉन्टिनेन्टस प्रकाशन, विजयनगर, पुणे ३०, आवृत्ती पहिली. २००२ पृष्ठ मनोगत |
| २. | सानप, किशोर | प्रायोगिक कादंबरी आणि श्याम मनोहर, बजाज पब्लिकेशन्स, अमरावती, आवृत्ती पहिली १९९८, पृष्ठ १८ |
| ३. | देशमुख, सदानंद | 'बारोमास' कॉन्टिनेन्टस प्रकाशन, विजयनगर, पुणे ३०, आवृत्ती पहिली. २००२ पृष्ठ १६५ |
| ४. | तत्रैव | पृष्ठ - ४४ |
| ५. | तत्रैव | पृष्ठ - १४ |
| ६. | तत्रैव | पृष्ठ - ९२ |
| ७. | तत्रैव | पृष्ठ - १५४ |
| ८. | तत्रैव | पृष्ठ - ३२४ |
| ९. | तत्रैव | पृष्ठ - १६३ |
| १०. | तत्रैव | पृष्ठ - ६० |
| ११. | तत्रैव | पृष्ठ - १३४ |
| १२. | तत्रैव | पृष्ठ - १११ |